**नवी मुंबई सायन्स फौण्डेशन**
[नोंदणी क्रमांक: महा /२५९२ / १० / (ठाणे)
[बॉम्बे सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक- F/२४०९३/ठाणे]
बी-५१, गीतांजली, भूखंड क्रमांक - ५२, सेक्टर – १७, वाशी,
नवी मुंबई – ४००७०३. (भ्रमण ध्वनी क्रमांक – ९३२४१ ६८५१०)
अध्यक्ष: डॉ. ए. एम. भागवत (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९३२४१ ६८५१०)
सचिव: डॉ. ए. के. राजराजन (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९९२०६ ४५९९०)
संयोजक: डॉ. जयंत जोशी (भ्रमण ध्वनी क्रमांक - ९८६९४ ६५१६९)

**श्री गुजराथी समाज**
न्यास नोंदणी क्रमांक: F/९६८ ठाणे (१९८३)
गुजराथ भवन, भूखंड क्रमांक - ६१ A/B सेक्टर-१५, वाशी,
नवी मुंबई -४००७०३
दूरध्वनी: २७८०० १३४, २७८००१३
मानद अध्यक्ष: श्री. हसमुखभाई कनानी
पूर्वाध्यक्ष: श्री. कौशिकभाई पटेल
सरचिटणीस: श्री. महेशभाई कथारीया

# विज्ञान उत्सव – २०२५

दि. : ०५ / ११ / २०२४.

**(पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय, नवीन पनवेल यांच्या सहयोगाने)**

**दोन दिवसीय शिक्षक परिषद (TC-२५) आणि विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन**

**महोदय / महोदया,**

नवी मुंबई सायन्स फौण्डेशन (NMSF) दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात **विज्ञान उत्सव** आयोजित करते. या शैक्षणिक वर्षाचा " **विज्ञान उत्सव** " ८ व ९ फेब्रुवारी, २०२५, ला होणार आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात **पहिल्या दिवशी शिक्षक परिषद (TC-२५) आणि दुसऱ्या दिवशी** विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन असेल.

या पूर्वी नवी मुंबई सायन्स फौण्डेशनला तुमच्या शाळेशी / कनिष्ठ महाविद्यालयाशी परस्पर संवादाचा फायदा झाला होता, आणि म्हणूनच, आम्हाला हे वैयक्तिक आमंत्रण तुम्हाला पाठवताना आनंद होत आहे. या दोन्ही कार्यक्रमासाठी तुमच्या शाळेतील / कनिष्ठ महविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी अशा दोघांच्याही उत्साही सहभागाची अपेक्षा आहे.

**शिक्षक परिषद-२०२५** ची मुख्य मध्यवर्ती कल्पना **"शालेय शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता"** अशी आहे आणि या संकल्पनेचे **टिपण** संदर्भासाठी जोडले आहे. तुमच्या शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित वरील संकल्पनेवर वैयक्तिकरित्या किंवा संयुक्तपणे एक किंवा अधिक शोधपत्र / निबंध सादर करावेत अशी विनंती आहे. परिषदे दरम्यान शिक्षकांना त्यांचे शोधपत्र सादर करण्याची संधी पण मिळेल. परिषदेची कार्यवाही / इतिवृत्त NMSF च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. सर्व स्वीकृत शोधपत्रांना **रोख रक्कम** प्रोत्साहन म्हणून मिळेल. **तसेच दुसऱ्या दिवशीच्या "विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनात"** इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना चांगल्या सहभागासाठी प्रोत्साहन दिले जाते.

"शिक्षक परिषदेसाठीचे शोधपत्र" पाठविण्याची अंतिम तारीख बुधवार, दि. १५ डिसेंबर, २०२४, आहे व "प्रयोगांवरील लेखन" पाठविण्यासाठी शनिवार, दि. १५ जानेवारी, २०२५, आहे. त्याबरोबर संकेतस्थळावर उपलब्ध असलेला संबंधित "गुगल नोंदणी फॉर्म" पण पाठवावा. शिक्षक परिषदेसाठीचे शोधपत्र व प्रयोगांवरील संपूर्ण शोधपत्र / लेखन "ई-मेल" द्वारे खालील ई-मेल पत्यावर पाठवले जाऊ शकता. nmsfscienceutsav@gmail.com **किंवा** jvjoshi२००२@yahoo.co.in

**संपर्कासाठी अन्य व्यक्ती**: **डॉ. ए. के. राजराजन** (ई-मेल **-** misraju@gmail.com, भ्रमण ध्वनी क्रमांक**: ९९२०६ ४५९९०**)
**डॉ. ए. एम्. भागवत** (ई-मेल - ambhagwat@gmail.com, भ्रमण ध्वनी क्रमांक: ९३२४१ ६८५१०)

## <u>सहभागासाठी नाममात्र नोंदणी शुल्क निश्चित केले आहे.</u>

१**) शिक्षक परिषदेसाठी: रु.५००/- प्रति सहभागी,** आणि २**) विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनासाठी: रु. २००/- दोन विद्यार्थ्यांच्या प्रति संघासाठी.**

कृपया "**दोन्ही गुगल नोंदणी फॉर्मसाठी" NMSF** च्या संकेत स्थळाला (www.navimumbaisciencefoundation.or) भेट द्या. सहभागासाठी इतर मार्गदर्शक तत्त्वे सोबत जोडली आहेत.

आम्ही तुमच्या शाळेच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा करतो.

हार्दिक शुभेच्छांसह,

आपला नम्र,

डॉ.जयंत जोशी, संयोजक, विज्ञान उत्सव-२०२५.

**जोडपत्र:** १. शिक्षक परिषद-२०२५ च्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित टिपण.
२. विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शनाच्या प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

**.......... पुढे चालू आहे.**

**नवी मुंबई सायन्स फौण्डेशन**

[नोंदणी क्रमांक: महा /२५९२ / १० / (ठाणे)
[बॉम्बे सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक- F/२४०९३/ठाणे]
बी-५१, गीतांजली, भूखंड क्रमांक - ५२, सेक्टर – १७, वाशी,
नवी मुंबई – ४००७०३. (भ्रमण ध्वनी क्रमांक – ९३२४१ ६८५१०)
अध्यक्ष: डॉ. ए. एम. भागवत (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९३२४१ ६८५१०)
सचिव: डॉ. ए. के. राजराजन (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९९२०६ ४५९९०)
संयोजक: डॉ. जयंत जोशी (भ्रमण ध्वनी क्रमांक - ९८६९४ ६५१६९)

**श्री गुजराथी समाज**

न्यास नोंदणी क्रमांक: F/९६८ ठाणे (१९८३)
गुजराथ भवन, भूखंड क्रमांक - ६१ A/B सेक्टर-१५, वाशी,
नवी मुंबई -४००७०३
दूरध्वनी: २७८०० १३४, २७८००१३
मानद अध्यक्ष: श्री. हसमुखभाई कनानी
पूर्वाध्यक्ष: श्री. कौशिकभाई पटेल
सरचिटणीस: श्री. महेशभाई कथारीया

# <u>विज्ञान उत्सव-२०२५</u>

## <u>विज्ञान प्रयोगांचे सहभागी प्रदर्शन (एकट्या प्रारूपाला परावृत्त केले जाते)</u>

### विद्यार्थी आणि शिक्षक-मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

**(दाखल होण्याची वेळ:** रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०८. ३० वाजता, श्री गुजरात समाज, सेक्टर १५, वाशी)

**परिचय:** शालेय अभ्यासा दरम्यान आलेल्या कोणत्याही वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित कोणताही प्रात्यक्षिक प्रयोग प्रदर्शित करून विद्यार्थी त्यांची सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्णता येथे प्रदर्शित करू शकतात. प्रयोगामध्ये प्रमाणीकरण, स्पष्टीकरण, वैज्ञानिक तत्त्वाचा वापर आणि/किंवा त्याची मर्यादा प्रदर्शित करणे आवश्यक आहे. प्रात्यक्षिकाच्या साधेपणावर भर द्यायला हवा, जेणेकरुन घरगुती वस्तू वापरून सुद्धा ते घरी सुरक्षितपणे केले जाऊ शकतात.

## <u>योजनेचे नियम खालीलप्रमाणे आहेत.</u>

१.प्रत्येक प्रयोगात सहभागींची संख्या दोनपेक्षा जास्त नसावी आणि सादरीकरणात त्यांची भूमिका स्पष्ट आणि पुरेशी असावी.

२. एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन प्रयोगांचा भाग असू शकतो.

३. इयत्ता ७ वी ते ९वीचे विद्यार्थी या प्रदर्शनातमध्ये भाग घेण्यास पात्र आहेत. ते भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा गणितातील कोणताही विषय निवडू शकतात. **साधारणपणे प्रति शाळेतील ५ संघांना परवानगी आहे.** जागा उपलब्धतेच्या अधीन राहून आणि पूर्वपरवानगी घेऊन शाळा अधिक प्रयोग सादर करू शकते.

३A . प्रत्येक शाळा आपल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी सोबत शिक्षक पाठवेल.

४. सहभागीं नी प्रयोगावर लेखन जमा करणे आवश्यक आहे (२०० शब्दांपेक्षा जास्त नाही). लेखनात एकसारखी रचना असावी म्हणजेच अ) ध्येय, / गृहीतक, ब) उपकरण, क) प्रायोगिक सेटअपचे बांधकाम, ड) मोजमापाची पद्धत, इ) डेटा संकलन, ई) चर्चा, उ) अनुमान / निष्कर्ष.

**५. <u>प्रयोगांची सांगड:</u> प्रयोग, विज्ञानाच्या कोणत्या वर्गाच्या पाठ्यपुस्तकाच्या कोणत्या धड्याशी संलग्न आहे (अभ्यासक्रमासह, म्हणजे CBSE/ICSE/CIE इ.) हे दाखविणाऱ्या प्रयोगांना सर्वोच्च प्राधान्य मिळेल.**

**६. गुगल नोंदणी फॉर्मसह तुमचे लेखन पाठवा: नोंदणी शुल्क: रु. २००/- प्रति संघ/प्रयोग.**

**लेखन आणि नोंदणी सबमिट करण्याची शेवटची तारीख शनि १५ जानेवारी २०२५, आहे.**

७. तज्ज्ञांच्या टीमने निवडलेल्या नोंदी केवळ प्रदर्शनात सहभागी होतील.

८. प्रयोग सुरक्षित आणि सहज पोर्टेबल असावा. त्याच्या प्रदर्शनासाठी फक्त <u>एक टेबल-टॉप जागा (४ फूट बाय २ फूट)</u> दिली जाईल. प्रयोगासाठी लागणारी सर्व "उपकरणे/साहित्य" सहभागीं नी आणली पाहिजेत. कोणताही वीज पुरवठा केला जाणार नाही. विद्युत उर्जेची आवश्यकता असलेले प्रयोग केवळ जास्तीत जास्त १२-व्होल्ट वीज पुरवठ्यावर आधारित असतील, याची काळजी घेणे. याची व्यवस्था पण प्रयोगकर्त्यांनी स्वतःच करायची आहे.

९. **परिक्षकांनी निवडलेल्या प्रदर्शनांना रोख बक्षिसे मिळतील. सर्व सहभागींना सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाईल.**

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~